**कृपया प्रसिध्दीसाठी** **04 एप्रिल 2009**

## 'विक्रमी मतांनी विजयी व्हा' - श्री राम नाईक यांना श्री बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद

**मुंबई, शनिवार:** शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी आज लोकसभा निवडणुकीच्या विजयासाठी श्री. राम नाईक यांना आशीर्वाद दिले.. भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबईतील उमेदवार म्हणून सातव्यांदा निवडणूक लढवीत असलेले श्री. राम नाईक या निवडणूकीसाठी श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद घेण्यासाठी 'मातोश्री' वर गेले होते, त्यावेळी श्री. ठाकरे यांनी 'आता विक्रमी मतांनी यश मिळवून विजयी व्हा' अशा शब्दात आपले आशीर्वाद दिले. यावेळी शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री उद्धव ठाकरे तसेच उत्तर-मध्य मुंबईतील भाजपा-शिवसेनेचे उमेदवार श्री महेश जेठमलानी हेही हजर होते.

एक दिलाने भाजपा कार्यकर्ते व शिवसैनिक उत्तर मुंबईत कामाला लागले आहेत. शिवसेनेतून फुटून काँग्रेसमध्ये गेलेले श्री. संजय निरुपम व मनसेत दाखल झालेले श्री. शिरीष पारकार यांना धडा शिकवण्याचा निश्चय सर्वांनी केला आहे. "उत्तर मुंबई हा नेहमीच भाजपा-शिवसेना युतीचा बालेकिल्ला राहिला आहे. आपले आशीर्वाद, माझे काम व कार्यकर्त्यांचे जोरदार मनोबल लाभल्याने मतदार युतीच्या बाजुनेच पुन्हा एकदा मतदान करतील", असा विश्वास यावेळी श्री. राम नाईक यांनी श्री. ठाकरे यांच्याकडे व्यक्त केला.

श्री. राम नाईक यांच्यासोबत भाजपा-मुंबईचे अध्यक्ष श्री. गोपाळ शेट्टी, उपाध्यक्षद्वय श्री जयप्रकाश ठाकूर व रमेश मेढेकर, सरचिटणीस श्री अतुल भातखळकर, शिवसेना विभागप्रमुख श्री. विनोद घोसाळकर, भाजपा उत्तर मुंबई चे अध्यक्ष श्री. योगेश सागर, चिटणीस श्री विनोद शेलार उपस्थित होते. उत्तर मध्य मुंबईचे युतीचे उमेदवार श्री महेश जेठमलानी हे ही श्री बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करण्यासाठी आले होते. त्यांच्यासोबत उत्तर-मध्य मुंबई भाजपा चे अध्यक्ष ॲड आशीष शेलार व माजी नगरसेवक श्री पराग अळवणी हे ही उपस्थित होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**